# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १८.११.२०२४

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १७/११/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३५,५००/- रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १७/११/२०२४ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण २४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ४,५७,७५५/-रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरुद्ध विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणा-या विरुध्द दि. १७/११/२०२४ रोजी पोस्टे औंढा नागनाथ ०१ येथे कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये एकुण ०१ ठिकाणी गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.

**सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ (COPTA 2003) अंतर्गत विक्रत्यावर कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्य दि. १७/११/२०२४ रोजी सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ अन्वये हिंगोली जिल्हा येथे एकुण ०३ ठिकाणी कलम ६,२४ अन्वये गुन्हे दाखल झाला असुन एकुण मिळालेला माल ३,६००/- रू यातील आरोपीने स्वत:चे फायदयाकरीता चालविलेल्या पानटपरी मध्ये महाराष्ट्र शासनाने विशिष्ट क्षेत्रातमध्ये प्रतिबंधीत केलेला तंबाखु जन्य वस्तु व सिगारेट/बिडी जन्य पदार्थ साठवुन वितरीत करत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा.